Gokhale Education Society's

**SMRK- BK- AK - Mahila Mahavidyalaya, Nashik-422005**

# Event Report

| | |
|---|---|
| Name of the Programme | सर डॉ. एम एस गोसावी संगीत महोत्सव २०२४-२५ |
| Day and Date | रविवार, १५ सप्टेंबर २०२४, गुरुदक्षिणा सभागृह |
| Organizing Committee /Department (Mention Collaborating Agency) | संगीत विभाग |
| Time | संध्याकाळी ६ ते ९ वाजता |
| Topic /Theme | संगीत कार्यक्रम/ महोत्सव |
| Resource Person/s | गायिका सौ रागिनी कामतीकर |
| Students and staff attended the Programme | ३०० |
| Brief Summary | एस एम आर के बीके एके महिला महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे दरवर्षी प्रमाणे यंदाही सर डॉ. एम एस गोसावी संगीत महोत्सव आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम गोखले एज्युकेशन सोसायटीच्या गुरुदक्षिणा सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रा.ज्ञानेश्वर कासार यांनी गायलेल्या 'ओम नमोजि आद्या' या ईशस्तवनाने झाली. त्यानंतर रंगमंचावर उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. कार्यक्रमाचे निवेदन डॉ.अश्लेषा कुलकर्णी मॅडम यांनी केले. संगीत विभाग प्रमुख डॉ. अविराज तायडे सर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या खेडेकर मॅडम यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सेक्रेटरी डॉ. सौ. दीप्ती देशपांडे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले.<br>नाशिकच्या सुप्रसिद्ध सुगम संगीत गायिका सौ रागिनी कामतीकर यांनी त्यांच्या कार्यक्रमाची सुरुवात गणपतीच्या स्तवनाने केली. गानसरस्वती लता मंगेशकर यांनी गाऊन अजरामर केलेली गाणी 'मेरी आवाज हि मेरी पहचान है', 'पिया तोसे नैना लागे रे' अशा अनेक गाण्यांचे सादरीकरण केले. तब्बल तीन तास चाललेल्या या कार्यक्रमात तबल्याच्या साथीला श्री. आदित्य कुलकर्णी व हार्मोनियम च्या साथीला श्री. अमित तांबे हे होते. कार्यक्रमाचे निवेदन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.<br>कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीत विभागाच्या प्रा. रुपाली काळे, पं. नितीन वारे, वैष्णवी भडकमकर व सर्व विद्यार्थिनींनी महत्वाचा सहभाग घेतला. |

डॉ. अविराज तायडे
विभागप्रमुख

डॉ. नितीन सोनगीरकर
उपप्राचार्य

डॉ. संध्या खेडेकर
प्राचार्या

**क्षणचित्रे**


















नाशिकच्या सुप्रसिद्ध सुगम संगीत गायिका सौ रागिनी कामतीकर गातांना